divyamarathi.com

# मानसिक स्वास्थ्य व आरोग्यविषयी जनजागृतीसाठी डी-स्ट्रेस हेल्पलाइन

## सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालयाचा पुढाकार

**प्रतिनिधी** | नगर

कोरोनाचा वाढता प्रकोप पाहून अनेकांना भय, चिंता, असुरक्षित वाटू लागले आहे. या आजाराबाबत नेमकी माहिती नसल्याने अनेक गैरसमजुती पसरत आहेत. माहिती उपलब्ध होऊन मदत व मानसिक आधार मिळणे सोपे व्हावे, म्हणून समाजकार्य व मानसशास्त्राचे प्राध्यापक व प्रशिक्षित कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागाने डॉ. भा. पां. हिवाळे शिक्षण संस्थेचे सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालय व भारतातील समाजकार्य कार्यकर्त्यांची राष्ट्रीय संघटना (नाप्स्वी) यांच्या वतीने हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. ८४८४४०७७३ वर संपर्क साधण्याचे आवाहन सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांनी केले आहे.

कोरोना संसर्ग टाळण्यासाठी काय काळजी घ्यावी, मानसिक स्वास्थ्य कशा प्रकारे सांभाळावे याविषयीचे समुपदेशन या हेल्पलाइनद्वारे केले जाणार आहे. संसर्गाबाबत शंका, गैरसमज, शासनाचे विविध नियम याबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे. शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या अत्यावश्यक सेवेची माहितीही दिली जाईल. डी-स्ट्रेस हेल्पलाइनच्या माध्यमातून माहिती, जनजागृती व समुपदेशनासाठी महाराष्ट्रातील प्रशिक्षित व अनुभवी समाज कार्यकर्ते, मानसशास्त्राचे प्राध्यापक, समुपदेशक आपली सेवा विनामूल्य देणार आहेत.

सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालयाने पुढाकार घेऊन समन्वय समितीची स्थापना केली आहे. तुळजापूर येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे ग्रामीण विकास विभागाचे अधिष्ठाता डॉ. रमेश जारे, नागपूर येथील मातृ सेवा संघ समाजकार्य महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. केशव वाळके, कोल्हापूर येथील छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस् एज्युकेशन एंड रिसर्चमधील डॉ. दीपक भोसले, धुळे समाजकार्य महाविद्यालयाचे डॉ. जालिंदर अडसूळ, नगर कॉलेजमधील मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ. प्रीतम बेदरकर, समुपदेशक रजनी कदम, डॉ. सचिन साळवे, विवेक दसरे, सोनाली गुजराती, डॉ. कौस्तुभ यादव यांचा संसाधन व्यक्तींमध्ये समावेश आहे. एम ए मास रिलेशन, समाजकार्य व मानसशास्त्र विषयाचे शिक्षण घेत असलेले विद्यार्थी स्वयंसेवक व इंटर्न म्हणून काम करणार आहेत.

## नागरिकांसाठी सेवा निःशुल्क

ही हेल्पलाइन सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सुरू आहे. ही सेवा निःशुल्क असून फोन करणाऱ्यांची माहिती गुप्त ठेवण्यात येईल.